आधुनिक केसरी

# वृत्तपत्रांचे अर्थकारण



## वसंत मुंडे

प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई



# वसंत माधवराव मुंडे

**शिक्षण** : **बी.ए.बी.जे.**
(डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

**पद** : प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई. (2020)
अध्यक्ष, औरंगाबाद विभागीय अधिस्वीकृती समिती (2015)

**कार्यरत** : 2003 पासून दैनिक लोकसत्ताचे बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत. तत्पूर्वी महाविद्यालयात शिकत असतानाच दै.मराठवाडा साथी व दै.लोकपत्रमधून बातमीदारीला सुरुवात.

**विशेष** :
* उस्मानाबाद मराठी पत्रकार संघाचा शोधवार्ता गटातील प्रथम पुरस्कार.
* उपेक्षित दलित, ऊसतोडणी कामगारांच्या लिखानावरुन समर्थन सेवाभावी संस्थेची शिष्यवृत्ती.
* 2007 मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी ग्रामीण भाग विकासाच्या अंमलबजावणीचा कायदा या विषयावर देशातून बोलावलेल्या निवडक पन्नास पत्रकारांच्या परिषदेसाठी निवड.
* जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने इतिहास संशोधक ज्येष्ठ संपादक स्व. स.मा.गर्गे यांच्या नावाने मागील दहा वर्षांपासून राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार योजनेबरोबरच गर्गे स्मारकाची उभारणी.
* बीड जिल्ह्यातील वंचित, उपेक्षित घटकांसाठी काम करणाऱ्या चार सामाजिक संस्थांना लेखणीद्वारे लोकसत्ताच्या माध्यमातून तीन कोटी रुपयांपेक्षा जास्त रोख निधी संकलित करुन पाठबळ.

**यामध्ये**
* एचआयव्ही बाधित मुलांसाठी काम करणारी इन्फंट इंडिया संस्था (बीड).
* आत्महत्याग्रस्त शेतकरी आणि ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी काम करणारी शांतीवन (आर्वी) संस्था.
* मुक्या वन्य जीवांसाठी काम करणारा सर्पराज्ञी प्रकल्प (तागडगाव)
* अनाथांसाठी काम करणारे सहारा अनाथालय संस्था (गेवराई)

१) शेतीविषयावर समग्र आणि सातत्याने लिखान, प्रामुख्याने प्राप्त परिस्थिती आणि आहे त्या साधनांवर तोट्यातील शेती फायद्यात आणणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशस्वी गाथांना प्राधान्य. दोन वर्षात पन्नास पेक्षा अधिक अशा शेतकऱ्यांना शोधून त्यांच्या यशस्वीतेवर लोकसत्ताच्या लोकशिवारमधून विपूल लेखन. शेतकरी आत्महत्येचा विषय ऐरणीवर असताना परिस्थितीशी झगडत शेती ही यशस्वीपणे करणारे शेतकरी दिशादर्शक ठरले. शासनाचे धोरण आणि शेतकऱ्यांची परिस्थिती यावर सातत्याने प्रकाश.

२) विविध क्षेत्रात यशस्वीपणे काम करणाऱ्यांना चर्चेतील चेहरे यातून समाजासमोर आणल्याने अनेकांना त्यातून प्रेरणा मिळण्यास आणि चांगले काम करण्यास प्रोत्साहन मिळाले.

३) ग्रामीण भागात गावांमध्ये शाळेच्या इमारतीपासून पिण्याच्या पाण्यापर्यंत आणि रस्त्यांचीही अबाळ असताना धार्मिक सप्ताहांवर मात्र कोट्यावधी रुपयांचा खर्च केला जातो. या सामाजिक व्यंगावर नेमकेपणाने प्रहार केल्याने अनेक गावांमध्ये शाळा इमारत दुरुस्ती आणि साहित्यासाठी निधी जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. 'धार्मिक गडांचे अर्थकारण' आणि 'गावात मुलभूत सुविधांची अबाळ असताना सप्ताहाच्या पंगतीवर कोटीचा खर्च' हे विषय मांडले.

४) शासन आणि प्रशासनातील धोरणावर बोट ठेवताना सुधारणा सुचवणाऱ्या बातम्यांचा सकारात्मक परिणाम.

५) तीन वर्षापासून प्रतिमाह व्याख्यानमालेचा उपक्रम.

६) महाराष्ट्र शासनाच्या औरंगाबाद विभागीय पत्रकार अधिस्वीकृती समिती अध्यक्षपदी संधी मिळाल्यानंतर प्रशासन आणि पत्रकार यांच्यातील संवादासाठी 'खुली चर्चा' उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात राबवला.

७) महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून राज्यात रक्तदान शिबीरे घेऊन दीड हजार पिशव्या रक्त संकलन.

८) वृत्तपत्राचे अर्थकारण व पत्रकारांच्या समस्यावर राज्यभर चर्चासत्रातून जागृती.




## विशेष संपादकीय

# वृत्तपत्रांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवणारे वसंत मुंडे

डॉ. प्रभू गोरे, संपादक

पत्रकारिता म्हणजे अतिसामान्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम. हेच समजून घेत वसंत मुंडे नावाचा तरुण पत्रकारितेत आला आणि सामान्यांचे प्रश्न मांडता मांडता वृत्तपत्रांचे आणि पत्रकारांचेही प्रश्न मांडू लागला! वाचून आश्चर्य वाटेल, पण वसंत मुंडे यांनी वयाच्या सोळाव्या वर्षांपासूनच भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला. विद्यार्थिदशेत असताना गावालगत रोजगार हमी योजनेत सामाजिक वनीकरणाच्या कामावरील मजुरांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन आर्थिक फसवणूक करण्यात आली. 'लोकमत'चे अंबाजोगाईतील तत्कालीन पत्रकार मोटेगावकर सरांना हा भ्रष्टाचार सांगून त्यांनी मजुरांना न्याय मिळवून दिला.

पुढे पत्रकारितेचं औपचारिक शिक्षण घेतल्यानंतर दैनिक लोकसत्तामध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती मिळाली आणि वसंत मुंडे तेथे वीस वर्षांपासून कार्यरत आहेत. लेखणीतून वंचित, उपेक्षित वर्गासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक मदत उभी करून दिली. शेती, शिक्षण या विषयांवर सकारात्मक व ऊर्जा निर्माण करणारे विपुल लिखाण केले. त्यातूनच तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी बोलावलेल्या निवडक पन्नास पत्रकारांच्या राष्ट्रीय परिषदेतही मुंडे यांची निवड झाली होती. ऊसतोडणी मजुरांबरोबर राहून लिहिलेल्या लेखमालिकेला 'समर्थ'ने शिष्यवृत्ती दिली. याशिवाय अनेक पुरस्कारही मिळाले. उत्तम संवाद व बिनधास्तपणे मोजक्या शब्दांत विषय मांडण्याची हातोटी हे त्यांचे वैशिष्ट्य.

### प्रश्न मांडले, मार्ग सांगितले

लेखणीतून सामान्यांचे प्रश्न मांडताना सहकारी पत्रकारांच्या प्रश्नांचीही जाणीव झाली. समाजाचे प्रश्न मांडणाऱ्यांच्या प्रश्नांकडे बऱ्याचदा डोळेझाक होते. राज्यकर्ते आणि समाजालाही पत्रकारांना काही प्रश्न असतील असे वाटत नाही. हे जाणवल्यानंतर मुंडे यांनी पत्रकार संघाच्या माध्यमातून वार्ताहर आणि संपादकांचे प्रश्न मांडत ते सोडवण्याचे मार्गही सांगितले. औरंगाबाद विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर मुंडे यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शासकीय समितीची पत्रकारांबरोबर थेट खुली चर्चा उपक्रम राबवला. त्यातूनच जाचक अटी शिथिल होऊन अधिस्वीकृती पत्रिका मिळण्याचा मार्ग सोपा झाला. शहरापासून गावपातळीपर्यंतच्या पत्रकारांचे प्रश्न मांडून ते सोडवले जात असल्याने याची दखल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली.

### संपादक नसलेला पहिला अध्यक्ष

वसंत मुंडे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या (मुंबई) राज्य अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संपादक नसताना पत्रकाराची अध्यक्षपदी निवड होण्याची संघटनेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ होय! तब्बल तेरा हजारांपेक्षा अधिक पत्रकार सदस्य असलेल्या संघटनेचे कामकाज अधिक लोकाभिमुख करण्यासाठी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यावर त्यांनी आधुनिक पद्धतीचा वापर केला.

### आत्मनिर्भर होण्यासाठी संपादकांची गोलमेज परिषद

समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अडचणीत असलेला वृत्तपत्र- व्यवसाय कोरोनामुळे अधिकच डबघाईला आला. जाहिरातींचा ओघ कमी झाल्याने साखळी वृत्तपत्रासह छोट्याही वृत्तपत्रांचे आर्थिक गणित बिघडले. उत्पादन खर्चाच्या तीस टक्के किंमतीत घरपोहोच वृत्तपत्र देण्याचे पारंपरिक धोरण; त्यात कोरोना, ऑनलाईन वाचनाची सवय यामुळे आर्थिक संकट ओढावले आणि काम करणाऱ्या पत्रकारांना पगारकपातीला सामोरे जावे लागले. अनेकांना तर



नोकरीही गमवावी लागली. अशा परिस्थितीत वसंत मुंडे यांनी औरंगाबादमध्ये संपादकांची पहिली गोलमेज परिषद घेऊन वृत्तपत्रांनी आर्थिक आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले. मागील वीस वर्षांत पेट्रोल ३० रुपयांवरुन १२० रुपये, तर डिझेल १६ रुपयांवरुन ९७ रुपये लिटर झाले. एक रुपयाचा चहा दहा रुपये झाला. छपाईचा कागद २५ रुपयांवरुन १०० रुपयांपर्यंत झाला. सरकारने जाहिरातीवर व इतर वस्तूंवर ५ टक्के जीएसटी आणि इतर कर लावल्याने किंमती पाच पटीने वाढल्या. असे सर्व वस्तूंचे भाव वाढत असताना वर्तमानपत्रांच्या किमतीत मात्र एक पटीनेही वाढ झाली नाही. आजही ८ ते १२ पानांची वर्तमानपत्रेही दोन ते पाच रुपयांत घरपोहोच दिली जातात. त्यामुळे उत्पादन खर्चाच्या २० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव उत्पादन आहे. जाहिराती कमी झाल्याने तोटा भरुन काढण्याचा अशक्य असल्याने विक्री किंमत वाढवण्याचे गणित वृतपत्रांचे मालक, संपादक, वितरक यांना पटवून दिले. लोकपत्रकार भागवत तावरे यांनी शब्दबद्ध केलेली वसंत मुंडे यांची 'वृत्तपत्रांचे अर्थकारण' या विषयावरील मुलाखत राज्यातील तब्बल तीनशेपेक्षा अधिक वृत्तपत्रांनी प्रकाशित करून समर्थन केले. परिणामी राज्यातील तीनशे पेक्षा अधिक दैनिकांनी विक्री किंमत वाढवली. एका पत्रकाराची एकच मुलाखत विविध दैनिकांत प्रसिद्ध होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने मुंडेंचे नेतृत्व सर्वमान्य झाले.

## साप्ताहिक सुट्टी घ्या, फायद्यात राहा!

वृत्तपत्र व्यवसायाला ऊर्जित करण्यासाठी केंद्र सरकारने करदात्यांना वृत्तपत्र खरेदीवर उत्पन्नकरात वार्षिक पाच हजारांची सवलत द्यावी, अशी मागणी श्री. वसंत मुंडे यांनी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्याकडे केली असून याबाबत सकारात्मक विचार चालू आहे. पूर्वी माहितीची इतर माध्यमे नसल्याने वृत्तपत्रे नियमित काढण्याचेही धोरण रूढ झाले. मात्र आता इतर साधने उपलब्ध असल्यामुळे वृत्तपत्रांनीही रविवारची सुट्टी घेतली पाहिजे. सरकारनेही आता पाच दिवसाचा आठवडा केला आहे. खासगी उद्योगातही सुट्टी असते. हा विचार मांडताना सुट्टीतून वृत्तपत्रांच्या आर्थिक फायद्याचे आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे गणित त्यांनी मांडले. याचा काही दैनिकांनी स्वीकार केल्याने त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

## नव्या उपक्रमांतून आश्वासक वातावरण

वर्षानुवर्ष सरकारकडे मागण्या करून काय साध्य झाले? याचा विचार करुन माध्यमातील लोकांनीच सक्षम झाले पाहिजे अशी भूमिका वसंत मुंडे यांनी केवळ मांडली नाही तर पत्रकार संघाच्या माध्यमातून नवीन पायंडे सुरू केले. कोरोना काळात २८ जिल्ह्यांतील पत्रकारांशी वेबसंवाद करुन लोकसहभागातून पत्रकारांना किराणा साहित्यासह मदत मिळवून दिली. पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्या. एकाच दिवशी राज्यभर 'रक्तदान' शिबिर घेऊन चौदाशे बॅग रक्त संकलन करुन देण्याचा विक्रम नोंदवला. समाज माध्यमाच्या मोहजालातही संवाद कायम राहावा यासाठी औरंगाबाद विभागीय कार्यालयात वार्तालाप तर बीड येथे मासिक व्याख्यानमाला सुरू केली. परिणामी राज्यभरात संघाच्या माध्यमातून वार्तालाप घेतले जात आहेत. दिवाळीत स्नेहमीलन, तर रमजान ईदमीलन कार्यक्रम घेऊन संघाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. मृत पत्रकारांच्या कुटुंबीयांना लोकसहभागातून मदत उपलब्ध करून देण्याबरोबरच वैद्यकीय उपचारांसाठीही संघाच्या माध्यमातून मदतीचा हात दिला. अशा नवीन उपक्रमातून संघटना आणि वृत्तपत्रक्षेत्रात नव्या परंपरा पुढे आणत या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी मुंडे यांनी आश्वासक वातावरण निर्माण केले आहे.

## पाच विभागीय अधिवेशने

वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर औरंगाबाद येथे संपादकांची गोलमेज परिषद, लातूर, ठाणे, नागपूर, जळगाव येथे विभागीय अधिवेशने घेऊन वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर जागृतीची चळवळच उभी केली आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर स्वतंत्र अधिवेशने होणे हे पहिल्यांदाच झाले.




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या नागपूर येथे आयोजित विदर्भस्तरीय दुसऱ्या अधिवेशन प्रसंगी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, विदर्भ अध्यक्ष प्रा. महेश पानसे, श्रीकृष्ण चांडक, श्रीपाद अपराजित, भास्कर लोंढे, डॉ. श्रीपाद अपराजित, सुदर्शन चक्रधर, शब्बीर अहमद विद्रोही आदींची उपस्थिती होती.




# वृत्तपत्रांनी पारंपरिक आर्थिक धोरण बदलून आत्मनिर्भर व्हावे : वसंत मुंडे

## संपादकांच्या गोलमेज परिषदेत अंकाची विक्री किंमत वाढविण्यावर एकमत

आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या वर्तमानपत्रांचे अर्थकारण कोरोना महामारीने डबघाईला आले. आता वृत्तपत्रांना आपले पारंपरिक आर्थिक धोरण बदलून आत्मनिर्भर व्हावे लागेल. त्यासाठी वृत्तपत्राच्या अंकाची किंमत वाढवून दर्जा सुधारावा लागेल. तरच वृत्तपत्रांना आर्थिक स्थैर्य मिळेल असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले. राज्यातील पहिल्या गोलमेज परिषदेत संपादकांनी अंकाची किंमत वाढीच्या भूमिकेचे स्वागत करुन पाठींबा दिला.

औरंगाबाद येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई च्या विभागीय कार्यालयाच्या वतीने राज्यातील पहिली वृत्तपत्र संपादकांची गोलमेज परिषद पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी दैनिक पुढारीचे संपादक धनंजय लांबे, सकाळचे कार्यकारी संपादक दयानंद माने, पुढारीचे युनिट हेड कल्याण पांडे, लोकपत्रचे कार्यकारी संपादक रविंद्र तहकीक, परिषदेचे निमंत्रक आणि पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.प्रभू गोरे, ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर, संघाचे विभागीय संघटक वैभव स्वामी, राज्य माध्यम समन्वयक भगवान राऊत यांच्यासह औरंगाबाद, जालना, अहमदनगर जिल्ह्यातील चाळीस वृत्तपत्रांचे संपादक उपस्थित होते. वर्तमानपत्रांचे पुजन करुन परिषदेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलतांना वसंत मुंडे म्हणाले, वृत्तपत्र कमी किंमतीत देण्याचे धोरण स्वीकारले गेले. अलीकडच्या काळात वृत्तपत्रांची संख्या वाढली आणि खप वाढवून जाहिरात मिळवण्यासाठी कमीत कमी किंमतीत वृत्तपत्रे घरपोहच देण्याची प्रथा सुरू झाली. जाहिरातीचे उत्पन्न कमी झाल्याने आता वृत्तपत्र क्षेत्राला आर्थिक दृष्ट्या वाईट दिवस आले ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पारंपारीक आर्थिक धोरणाची मानसिकता बदलून अंकाची किंमत वाढवणे आणि दर्जेदार वर्तमानपत्र वाचकांच्या हाती देणे ही जबाबदारी संपादक व पत्रकारांना घ्यावी लागेल. तरच वृत्तपत्र आर्थिक पातळीवर सक्षम होतील. पारंपारिक पध्दतीने वृत्तपत्र चालवले तर फार काळ तोट्यात चालवणे शक्य होणार नाही परिणामी विभाग आणि जिल्हास्तरावरची वृत्तपत्रे बंद झाली तर स्थानिक राज्य व्यवस्था निरंकुश होतील व सर्वसामान्य माणसाचा आवाजच बंद होईल. याची जाणीव आता वाचकांना करुन देण्याची वेळ आली आहे. अलीकडच्या काळात वृत्तपत्रांचा कागद, शाई व छपाई खर्च दुपटीने वाढला. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून वृत्तपत्र मात्र 2 ते 5 रुपयात विकले जाते. प्रचंड तोटा सहन करुन हा व्यवसाय करावा लागतो. मधल्या काळात अनेक राजकारणी व्यक्ती, उद्योजक व भांडवलदारांनी आपल्या वेगवेगळ्या फायद्यासाठी वर्तमानपत्र काढले. मात्र या क्षेत्राला स्थैर्य मिळवून देण्याची भूमिका कुणीही घेतली नाही. ती भूमिका आता आपल्या सर्वांना घ्यावी लागेल असेही मुंडे यांनी सांगितले.

संपादक धनंजय लांबे म्हणाले, आर्थिक गणित बिघडले की त्याचा दैनिक मराठवाडा होता. त्यामुळे वृत्तपत्रांच्या आर्थिक धोरणात बदल करण्यासाठी आता वृत्तपत्र मालकांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे लागेल. आपले मूल्य आपल्यालाच वाढवावे लागेल आणि प्रत्येकाने दर्जेदार पध्दतीने काम करून आपली क्षमता सिद्ध करावी लागेल, त्यासाठी निराशेची मरगळ झटकून नव्या जोमाने काम करावे असे आवाहन त्यांनी केले. तर संपादक दयानंद माने यांनी वृत्तवाहिन्या आणि समाज माध्यमांच्या भूमिकेने वृत्तपत्रांच्या खपावर दुरगामी परिणाम झाला आहे. डिजिटल माध्यमांकडे डोळसपणे पाहुन बदलत्या परिस्थितीत वृत्तपत्र टिकवून ठेवण्यासाठी पुन्हा नव्या जोमाने आणि नवीन धोरणाने काम करावे लागणार आहे. तर कल्याण पांडे यांनी वृत्तपत्रांचे आर्थिक गणित अत्यंत सोप्या पध्दतीत मांडले. कोरोनानंतर मोठी साखळी वृत्तपत्र आणि विभागीय व जिल्हा दैनिकांच्या अडचणी सारख्याच झाल्या आहेत. कोणताही फरक राहिला नाही. जाहिराती मिळवण्यासाठी खप वाढवला की तोटा वाढतो. त्यामुळे किंमती वाढवणे याचा विचार आता सर्वांनाच करावा लागेल.



त्यासाठी एकत्र येऊन सामुहिक निर्णय घेतला तर या क्षेत्राला पुन्हा आर्थिक स्थैर्य मिळू शकते असा विश्वास व्यक्त केला. संपादक रविंद्र तहकीक यांनी माध्यम क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी एका पत्रकाराला विधान परिषदेवर नियुक्त करावे. त्याचबरोबर वृत्तपत्रांनी किंमत वाढवून समाजामध्ये आपली पत निर्माण करावी असे आवाहन केले.

यावेळी निमंत्रक प्रा.डॉ.प्रभू गोरे यांनी परिषदेची भूमिका मांडताना आतापर्यंत वृत्तपत्रांनी समाजाच्या सर्व घटकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली. मात्र आता वृत्तपत्रच अडचणीत आल्याने सर्वांनी एकत्र येऊन या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी निर्णय घ्यावा लागेल. आता आपल्यासाठी एकत्र येण्यासाठी ही परिषद असल्याचे सांगितले. तर पत्रकार संघाचे महानगर अध्यक्ष अनिल सावंत यांनी वृत्तपत्रांसाठी कठीण काळात किंमत वाढवणे हा पर्याय योग्य असल्याचे सांगुन एकत्रितपणे निर्णय घेण्याचे आवाहन केले.

परिषदेत वृत्तपत्रांनी अंकाची किंमत वाढवून, दर्जा सुधारुन स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा. शासनाने वृत्तपत्रांना कागद व शाई सवलतीच्या दरात उपलब्ध करुन द्यावीत. वस्तु आणि सेवा करातुन सुट द्यावी. कोरोना संकटात कर्मचारी व पगार कपातीबाबत वृत्तपत्रांच्या मालकांना परावृत्त करावे. वृत्तपत्र क्षेत्राला लघू उद्योगाचा दर्जा द्यावा. शासनाच्या जास्तीत जास्त जाहिराती विभागीय व जिल्हा दैनिकांना देण्याचे एबीसीला बंधनकारक करावे. कोरोना काळात शहीद झालेल्या पत्रकारांना घोषणा केल्याप्रमाणे पन्नास लाख रुपयांच्या विमा कवच अंतर्गत मदत करावी. घरकुल व आरोग्य विमा योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करुन पत्रकारांना आधार द्यावा आदि मागण्यांचे ठराव गोलमेज परिषदेत संमत करण्यात आले.

परिषदेला मेट्रो न्यूज चे संपादक मकरंद घोडके, अहमदनगर घडामोडीचे संपादक मनोज मोतीयानी, नगर स्वतंत्र चे संपादक सुभाष चिंध्ये व कार्यकारी संपादक सुभाष मुदळ, लाभवार्ता चे संपादक मनोज पाटणी, दै. बदलता महाराष्ट्र चे संपादक विष्णू कदम, दै. राज्यवार्ता चे संपादक भरत मानकर, लाईव्ह महाराष्ट्रचे कृष्णा लोखंडे, वृत्त टाईम्सचे संपादक कल्याण अन्नपूर्णे, मनोज पाटणी, बहुजन हितायचे बबन सोनवणे, पब्लिक शासनचे प्रशांत पाटील, निळे प्रतिकचे संपादक रतनकुमार साळवे, आकाश सपकाळ, जगन्नाथ सुपेकर, दै. सत्यनितीचे संपादक देविदास कोळेकर, पोलिस न्यूजचे संपादक कृष्णा कोल्हे, अशोक वानखेडे, रमाकांत कुलकर्णी, अभिजित हिरप, पुण्यनगरीचे डॉ. शेषराव पठाडे, दै. महानगरीचे अशोक देढे, लातूर पॅटर्नचे गोविंद काळे आदी उपस्थित होते.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी सचिव दिपक मस्के, संघटक विलास शिंगी, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख जॉन भालेराव, सरचिटणीस शिवाजी गायकवाड, महानगर उपाध्यक्ष हनुमंत कोल्हे, बी.आर.इव्हेंट्स चे ऋषिकेश राऊत, अभिषेक राऊत आदींनी परिश्रम घेतले.

प्रारंभी कोरोना काळात शाहिद झालेले पत्रकार व वीर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. परिषदेचे निमंत्रक प्रा.डॉ. प्रभू गोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राज्य माध्यम समन्वयक भगवान राऊत यांनी विविध ठरावांचे वाचन केले. प्रसिद्धी प्रमुख सचिन अंभोरे यांनी सुत्रसंचालन केले. जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

आधुनिक केसरी




महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक मराठवाडा साथी यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार वितरण केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख डॉ. दिनकर माने यांना सन्मानित करण्यात आले. सोबत प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, जगदीश बियाणी, मनिषा बन्साळी, सतीश लोढा.

# वृत्तपत्र विकत घेणाऱ्यांना आयकरात सवलत देऊ : डॉ. भागवत कराड

मराठवाड्यातील माणसाला कोणत्याही क्षेत्रात संधी मिळाल्यानंतर प्रत्येकानेच त्याचा योग्य उपयोग केला. वसंत मुंडे यांनीही पत्रकारीतेच्या क्षेत्रात राज्यभरातील पत्रकारांचे मजबुत संघटन उभे करुन या क्षेत्रातील प्रश्न मांडून सोडवण्यासाठीचे मार्गही सांगितले आहेत. मलाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे केंद्रात अर्थ खात्याचे राज्यमंत्रीपद मिळाले. लोकशाहीत वृत्तपत्र समाजाला जागृत करुन दिशा देण्याचे काम करत असल्याने मला केंद्रात मिळालेल्या संधीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पत्रकारांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपला पुढाकार राहील. वसंत मुंडे यांच्या मागणीनुसार वृत्तपत्र विकत घेणाऱ्या आयकरदात्यांना प्रतिवर्षी पाच हजार रुपये कर सवलत देण्याचा प्रयत्न केला जाईल अशी महत्वपूर्ण घोषणा केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी केली.

औरंगाबाद येथे रविवार दि. 16 जानेवारी रोजी सायंकाळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक मराठवाडा साथी यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार वितरण केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, जगदीश बियाणी, मनिषा बन्साळी, सतीश लोढा यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ.कराड म्हणाले, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी वसंत मुंडे यांची निवड झाल्यानंतर राज्यभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून पत्रकारांना प्रोत्साहन देणे, त्यांचे प्रश्न मांडून सोडवणे. उपक्रम राबवणे यामुळे संघटनात्मक काम वाढले आहे. मी केंद्रीय मंत्री झाल्यानंतर अनेक वेळा पत्रकार संघाच्या कार्यक्रमाला आलो आहे. पत्रकार व वृत्तपत्रांचे प्रश्न मांडून ते सोडवण्यासाठीचे मार्गही मुंडे यांनी सांगितले आहेत. लोकशाहीत वृत्तपत्र आणि पत्रकार हे समाजाला जागृत करण्याचे आणि दिशा देण्याचे काम करत आहेत. त्यामुळे या घटकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपला पुढाकार राहील. त्याच बरोबर केंद्र सरकारच्या विविध आर्थिक योजनांचा पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांना लाभ मिळावा यासाठी आपण स्वतः पुढाकार घेवू. यासाठी पत्रकारांनी केंद्र सरकारच्या योजनांचा अभ्यास करुन त्याचा फायदा घेण्यासाठी प्रयत्न करावा असे

## वसंत मुंडे यांच्या प्रयत्नाला यश



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी वृत्तपत्राला आर्थिक तोट्यातून बाहेर काढण्यासाठी वृत्तपत्राची किंमत वाढ यासह अनेक महत्वाच्या भुमिका सातत्याने मांडल्या. तसेच वृत्तपत्र विकत घेणाऱ्यांना आयकरातून सवलत मिळावी, ही मागणी लावून धरली या कर सवलतीमुळे सरकारचाही फायदा होणार आहे, हे शास्त्र शुध्द पद्धतीने समजावून सांगितले. ही सवलत दिल्यास रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. तसेच वृत्तपत्र व्यवसायामध्ये क्रांतीकारी बदल होणार असल्याचे केंद्र सरकारच्या लक्षात आणून दिले, त्यामुळे केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी या कार्यक्रमात महत्वपूर्ण घोषणा केली. वसंत मुंडे यांच्या मागणीला मिळालेले हे अभुतपूर्व यशच म्हणावे लागेल. कर सवलतीचा निर्णय जेव्हा प्रत्यक्षात अमलात येईल तेव्हा, वृत्तपत्र व्यवसायामध्ये अर्थिक क्रांतीचे नवे पर्व सुरू होईल आणि याचे श्रेय मराठवाड्याच्या या दोन भूमीपुत्रांना असेल.



# वार्षिक 5 हजार रुपयांचा परतावा देणेबाबत विचार

आवाहन त्यांनी केले. कोरोनानंतर वृत्तपत्र व्यवसायासमोर आर्थिक संकट आले आहे. डिजिटल मीडियाचे प्रस्थ वाढले असले तरी आजही वृत्तपत्रांची विश्वासार्हता समाजात कायम आहे. म्हणून वृत्तपत्र व्यवसायाला आर्थिक ताकद देण्याचे सरकार म्हणुन आमची जबाबदारी आहे. यासाठी वसंत मुंडे यांच्या मागणीनुसार वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना वार्षिक पाच हजार रुपये करात सुट देण्याची मागणी योग्य असुन ती मंजुर करुन घेण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी चर्चा करू. यासाठी पत्रकार संघाने एक समिती स्थापन करुन प्रस्ताव केंद्र सरकारकडे द्यावा अशी सुचनाही त्यांनी केली. तर वसंत मुंडे यांनी वृत्तपत्र व्यवसायासमोरील आर्थिक अडचणी आणि पारंपारीक धोरण याबाबत स्पष्ट भूमिका मांडून लोकशाहीतील चौथा स्तंभ असलेल्या पत्रकार व वृत्तपत्रांना आर्थिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र विकत घेणाऱ्या करदात्यांना करात सवलत देण्याची मागणी केली. त्याच पध्दतीने पत्रकार आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्या शिवाय तो चांगल्या पध्दतीने काम करू शकणार नाही. यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन वृत्तपत्र क्षेत्राला मदत करावी, असे आवाहन केले. प्रास्तविकात चंदुलाल बियाणी यांनी दै.मराठवाडा साथीच्या वाटचालीचा आढावा घेऊन स्व.मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रावण गिरी, प्रशांत जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन संदिप बेद्रे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विलास शिंगी, मुकेश मुंदडा, राधेशाम झंवर, सचिन शेरे, वृषाली पेंढारकर, सविता खांडेकर, राहूल राठी, मनोज पाटणी, संजय व्यापारी, माजेद खान, सचिन पवार, तुकाराम राऊत, शिवानंद चक्करवार, पांडुरंग जाधव आदिंनी परिश्रम घेतले. यावेळी राज्यस्तरीय पुरस्काराने प्रो.डॉ. दिनकर माने (विभाग प्रमुख, जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), डॉ. बबन जोगदंड (प्रभारी अधिकारी, यशदा, पुणे), संतोष मानूरकर (संपादक दै.दिव्य लोकप्रभा, बीड) यांच्यासह अनेक पत्रकारांना यावेळी पुरस्कार देवून केंद्रीय मंत्री डॉ.कराड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार बाबा गाडे, प्रकाश भगनुरे, डॉ. संजिवकुमार सावळे, डॉ.संध्या मोहिते, संतोष शिंदे, राम वायभट आदिंसह विविध दैनिकांच्या पत्रकारांची उपस्थिती होती.

# म्हाडा अंतर्गत पत्रकारांसाठी विशेष गट करुन गृहनिर्माणची योजना करणार

राज्यभरातील पत्रकारांसाठीही म्हाडा अंतर्गत विशेष गट करुन गृहनिर्माण योजना राबवण्यासाठी गृहनिर्माण विभागाच्या सचिवांना प्रस्ताव मंत्री मंडळासमोर ठेवण्याचे आदेश गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिले आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मंत्री आव्हाड यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करुन पत्रकारांसाठी स्वतंत्र योजना राबवण्याचा आग्रह धरला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मुंबई आणि सोलापूरच्या धर्तीवर म्हाडा अंतर्गत ग्रामीण भागातील जिल्हा आणि तालुका पातळीवरील पत्रकारांसाठी स्वतंत्र गट करुन गृहनिर्माण योजना राबवावी अशी मागणी केली. मागील अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या संघटना, पत्रकार सातत्याने गृहनिर्माणची मागणी करत आहेत. मात्र ग्रामीण भागात म्हाडा अंतर्गत जागा नसल्यामुळे या योजना राबवताना अडचणी निर्माण होतात. तर आदर्श प्रकरणानंतर खाजगी गृहनिर्माण संस्थांना जागा न देण्याचे धोरण सरकारने घेतले असल्यामुळे पत्रकारांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित आहे. याबाबत गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी विषय पूर्णपणे समजून घेऊन राज्यातील पत्रकारांनाही घरे मिळाली पाहिजेत यासाठी राज्यभर धोरण निर्माण करण्याची भूमिका घेतली आहे. जिल्हा आणि तालुकास्तरावर



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या मागणीवर मंत्री जितेंद्र आव्हाड यांची ग्वाही

महसूल, नगरपालिका, जिल्हा परिषद मालकीच्या जागा म्हाडाकडे हस्तांतरीत करुन मागणी नुसार पत्रकारांची गृहनिर्माण योजना राबवण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्याबाबत मंत्री आव्हाड यांनी गृहनिर्माण सचिवांना आदेश दिले आहेत. मंत्री आव्हाड यांच्या या भूमिकेने महाराष्ट्रातील पत्रकारांच्या गृहनिर्माणच्या प्रश्नाला चालना मिळाली आहे.



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागीय अधिवेशन प्रसंगी उपस्थित ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, राष्ट्रसंत एकनाथ महाराज, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, मार्गदर्शक संतोष मानूरकर, संजय जेवरीकर, यशवंत भंडारे आदी मान्यवर.

# वृत्तपत्रांना विक्री किंमत वाढवूनच सक्षम व्हावे लागेल : वसंत मुंडे

सरकारकडे मागण्या करण्यापेक्षा बदललेल्या परिस्थितीत स्थानिक पातळीवरील वृत्तपत्र व पत्रकारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी पारंपारीक धोरण बदलावे लागेल. स्वस्तात वृत्तपत्र देऊन तोटा भरुन काढण्यासाठी जाहिरातीवर अवलंबून राहण्याचे दिवस आता संपले आहेत. दहा वर्षात सर्वच वस्तुंचे भाव वाढले आहेत. सरकारने विविध कर लावले आहेत. अशा परिस्थितीत वृत्तपत्रांना विक्री किंमत वाढवूनच सक्षम व्हावे लागेल, असे मत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले.

रविवार दि.28 नोव्हेंबर रोजी लातूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मराठवाडा विभागीय अधिवेशनात ते बोलत होते. यावेळी दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, राष्ट्रसंत एकनाथ महाराज, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, मार्गदर्शक संतोष मानूरकर, संजय जेवरीकर, माहिती व जनसंपर्क लातुर विभागाचे उपसंचालक यशवंत भंडारे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, विभागीय सचिव दिपरत्न निलंगेकर, विभागीय उपाध्यक्ष दयानंद जडे, संयोजक लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांच्यासह विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले की, पत्रकार सातत्याने सरकारकडे मागण्या करत आहेत. मात्र सरकार फारसे गांभीर्याने घेत नसल्याने पत्रकारांचे प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. कोरोना काळात सरकारने आरोग्य आणि पोलिस कर्मचाऱ्यांप्रमाणे पत्रकारांनाही विमा संरक्षण देण्याची घोषणा केली होती. मात्र अंमलबजावणी केली नाही ही सार्वजनिक फसवणूक आहे. त्यामुळे सरकारकडे मागण्या करण्यापेक्षा बदललेल्या परिस्थितीत स्थानिक पातळीवरील वृत्तपत्र व पत्रकारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी पारंपारीक धोरण बदलावे लागेल. स्वस्तात वृत्तपत्र देऊन तोटा भरुन काढण्यासाठी जाहिरातीवर अवलंबून राहण्याचे दिवस आता संपले आहेत. दहा वर्षात सर्वच वस्तुंचे भाव वाढले आहेत. सरकारने विविध कर लावले आहेत. अशा परिस्थितीत वृत्तपत्रांना विक्री किंमत वाढवूनच सक्षम व्हावे लागेल. संपादकांच्या गोलमेज परिषदेनंतर महाराष्ट्रातील दोनशे दैनिकांनी अंकाची किंमत वाढवली. इतरांनीही आता पुढाकार घेतला पाहिजे. इतर व्यवस्थापनाप्रमाणे वृत्तपत्रांनीही आठवड्यातून एक दिवस सुट्टी घेऊन आपल्या खर्चात बचत करुन कर्मचाऱ्यांनाही उसंत द्यावी, असे आवाहन केले.

यावेळी दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे म्हणाले की, काही वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना माध्यमांसमोर येऊन आपली व्यथा मांडावी लागली होती. त्यामुळे भारतीय लोकशाहीत राजकर्ते, प्रशासन, न्याय आणि प्रसारमाध्यमे या चार व्यवस्था प्रमुख असल्या तरी सर्वाधिक प्रभाव पत्रकारांचा आहे. प्रश्न सत्ताधाऱ्यांनाच विचारले जातात याचे भान बहुमताने सत्तेवर असलेल्यांनाही असले पाहिजे. असे सांगत प्रामाणिकपणे पत्रकारीता करणाऱ्यांची सत्ताधाऱ्यांनाही धास्ती असते. सरकारमधील सत्ताधाऱ्यांना अनेकदा माध्यमांचाच आधार घ्यावा लागतो. राजकीय नेत्यांना पत्रकारच बातम्यांमधून घडवत असतो. त्यांना जर पत्रकारांची किंमत वाटत नसेल तर आपण पत्रकारांनीही त्यांना त्यांची जागा दाखवण्याची क्षमता ठेवली पाहिजे.

लातुरचे दिवंगत विलासराव देशमुख, बीडचे गोपीनाथ मुंडे, नांदेडचे शंकरराव चव्हाण या नेत्यांनी देशात नेतृत्व केले. त्यांची सर्वसामान्य माणसाशी आणि पत्रकारांशी नाळ जोडलेली होती. पत्रकारांची शक्ती त्यांना माहित होती. त्यामुळे वर्तमान परिस्थितीमध्ये प्रत्येक देशमुख, विलासराव आणि प्रत्येक मुंडे, गोपीनाथराव तर प्रत्येक चव्हाण, शंकरराव होत नसतात असा टोलाही त्यांनी लगावला. या पहिल्या विभागीय मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी औरंगाबादचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, ग्रामीणचे अध्यक्ष शांताराम मगर, जालना जिल्हाध्यक्ष दिगंबर गुजर, परभणी जिल्हाध्यक्ष विलास चव्हाण, हिंगोली जिल्हाध्यक्ष प्रद्युम्न गिरीकर, नांदेड जिल्हाध्यक्ष डॉ.भास्कर भोसले, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, बीडचे जिल्हा उपाध्यक्ष नागनाथ जाधव यांनी केलेल्या परिश्रमामुळे मराठवाड्यातील प्रत्येक तालुका आणि ग्रामीण भागातील पत्रकार अधिवेशनाला उपस्थित राहिल्याने विभागस्तरावरील पहिले अधिवेशन ऐतिहासिक ठरले.






**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे सोळावे राज्यस्तरीय अधिवेशन ठाणे येथे पार पडले. या वेळी केंद्रीय मंत्री कपील पाटील यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे आणि कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे.**

# वृत्तपत्रांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पाठपुरावा करु : केंद्रीय राज्यमंत्री कपील पाटील

प्रसार माध्यामाचा प्रभाव कमी झाला तर लोकशाही कमकुवत होईल, त्यामुळे समाजानेच माध्यमांची उपयुक्तता ओळखुन वृत्तपत्रांना मदत करावी. पत्रकारांनीही कोणाच्या सांगण्यावरून बातमी न देता खरी माहिती द्यावी, म्हणजे विश्वास वाढेल, असे सांगुन प्रबोधनाचे मार्केटिंग होणार नाही याची खबरदारी पत्रकारांनी घ्यावी असे आवाहन केंद्रीय मंत्री कपील पाटील यांनी केले. मराठी वृत्तपत्रांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी वसंत मुंडे यांनी जे कार्य हाती घेतले आहे ते कौतुकास्पद आहे. वृत्तपत्रांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे सोळावे राज्यस्तरीय अधिवेशन ठाणे येथील गडकरी रंगायतन सभागृहात मंगळवार दिनांक 28 डिसेंबर रोजी दोन सत्रात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. मागील दोन वर्षांपासून कोरोना जागतिक महामारीमुळे पत्रकार संघाचे राज्यअधिवेशन टाळण्यात आले होते. मात्र यंदा पत्रकार बांधवांच्या आग्रहाखातर कोरोना नियामाचे पालन करून प्रदेशध्यक्ष वसंत मुंडे यांच्या खंबीर नेतृत्वखाली ठाण्यात सोळावे राज्य अधिवेशन यशस्वीरित्या संपन्न झाले. कोरोना काळात वृत्तपत्र व पत्रकारांसमोर उध्दभवलेल्या समस्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन, ऑनलाइन चर्चा करून, संपादकांची गोलमेज परिषद घेवून तसेच विभागीय अधिवेशनाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बारकाईने अभ्यास केला. त्यामुळेच या अधिवेशनात दोन्ही सत्रात वृत्तपत्रसृष्टी समोरील समस्या व उपायावर चर्चा होऊन भविष्यात सकारात्मक कार्य करण्याची ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थित पत्रकार बांधवांनी वक्त केली. या अधिवेशनाचे उद्‌घाटन केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सरचिटणीस विश्वास आरोटे, कार्याध्यक्ष राकेश टोळ्ये, मनिष केत, नितीन जाधव यांच्यासह सर्व विभागीय अध्यक्ष व राज्यभरातून पाचशे पेक्षा जास्त पत्रकार उपस्थित होते. यावेळी बोलताना कपिल पाटील यांनी मराठी पत्रकरीतेचा इतिहास आणि सध्याची परिस्थिती यावर नेमकेपणाने बोट ठेवले. पत्रकारांच्या हत्या आणि अटक याचा उल्लेख करत पत्रकारांसमोरील धोके स्पष्ट केले. लोकशाहीत पत्रकार हा चौथा खांब असल्याने लोकशाहीची इमारत मजबूत आहे. बदलत्या परिस्थितीत माध्यमांचा प्रभाव कमी झाला तर लोकशाहीच कमकुवत होईल. त्यामुळे समाजानेच माध्यमाची उपयुक्तता ओळखुन वृत्तपत्रांना मदत केली पाहिजे. त्यासाठी पत्रकारांनीही कोणाच्या सांगण्यावरून बातमी न देता खरी माहिती द्यावी. म्हणजे लोकांचा वृत्तपत्रांवरील विश्वास वाढेल. आपल्या बाबत कोणाच्या सांगण्यावरून दिलेल्या दोन बातम्याची उदाहरणे देऊन त्यांनी पत्रकरीतेतील चुकीच्या बाबीबरही परखड मत मांडले. पण अपवाद वगळता पत्रकारांमुळेच समाजच प्रबोधन होत. त्यामुळे प्रबोधनाचे मार्केटिंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. शेवटी ना. पाटील यांनी राज्य पत्रकार संघाच्या कार्याचे कौतुक करून केंद्रीय स्तरावरील मागण्यांसाठी मदत करण्याची ग्वाही दिली.

**अंक विक्रीचे पारंपरिक धोरण बदलले तरच मराठी वृत्तपत्रांना स्थैर्य- प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे**

पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपली भूमिका मांडताना पत्रकारांसमोरील समस्यांचा सविस्तर मागोवा घेतला. कोरोनानंतर प्रादेशिक वर्तमानपत्रांसमोरील आव्हाने मांडून त्यांनी वृत्तपत्रे आर्थिक पातळीवर आत्मनिर्भर होण्यासाठी स्वस्तात अंक विक्री करण्याचे पारंपरिक धोरण बदलावे आणि असे केले तरच या क्षेत्रात काम करणाऱ्यांना रोजगाराचे स्थैर्य मिळेल, असे सांगितले. शेवटी त्यांनी पत्रकार संघाच्या वर्षभरातील कामाचा अहवाल सादर केला. सरचिटणीस विश्वास आरोटे व कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे यांनी प्रास्ताविक केले.






**नागपूर येथे आयोजित विदर्भस्तरीय दुसऱ्या अधिवेशन प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री विलासराव मुत्तेमवार, प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, उमरेडचे आमदार राजू पारवे, श्रीकृष्ण चांडक आदी उपस्थित होते.**

# महागाईप्रमाणे वृत्तपत्रांच्या अंकाची विक्री किंमत वाढली पाहिजे : विलासराव मुत्तेमवार

पूर्वी वृत्तपत्र चालवण्यासाठी प्रचंड मेहनत, भांडवल गुंतवूनही हा उद्योग चालवणे आव्हानात्मक होते. आता अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध असल्यामुळे वृत्तपत्राचे स्वरुप कमालीचे बदलले आहे. मात्र महागाईच्या प्रमाणात वृत्तपत्रांच्या अंकाची किंमत वाढली नसल्यामुळे या क्षेत्रापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे महागाईच्या तुलनेत अंकाची किंमतही वाढवली पाहिजे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री विलासराव मुत्तेमवार यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २४ एप्रिल रोजी विदर्भस्तरीय दुसरे अधिवेशन नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, उमरेडचे आमदार राजू पारवे, दैनिक ओशन वृत्तपत्राचे संपादक श्रीकृष्ण चांडक आदी मान्यवर उपस्थित होते.

आजही वृत्तपत्र उद्योग चालवणे कठीण होत आहे. छोट्या गावात दोन, चार, सहा, बारा पानी वर्तमानपत्रे चालवणे अवघड काम आहे. तरीही वृत्तपत्र उद्योगात पत्रकार, संपादक कागदाच्या किमती वाढवूनही, महागाई वाढल्यानंतरही दोन, पाच रुपयांना घरपोच वर्तमानपत्र उपलब्ध करून देत आहेत. विलासराव मुत्तेमवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते उद्घाटन करून स्वतःचे दैनिक सुरू केले. जी त्याने स्पर्धेमुळे अकरा वर्षे चालवली. यावेळी त्यांनी पत्रकार, वृत्तपत्र उद्योगासमोरील आव्हानांचा उल्लेख केला. इलेक्ट्रॉनिक युगात झटपट बातम्यांच्या मागणीमुळे, विशेषतः आजच्या दूरचित्रवाणी वाहिन्यांमुळे वृत्तपत्रांचे संचलन कमी होत असल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दोन वर्षांपासून साथीच्या आजारामुळे अनेक पत्रकारांचा अकाली मृत्यू झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. मुंडे म्हणाले की, कोरोनाच्या काळात देशवासीयांपर्यंत बातम्या पोहोचवण्यासाठी रात्रंदिवस काम करून हजारो पत्रकारांनी आपला जीव गमावला. अनेक पत्रकारांच्या नोकऱ्या गेल्यानंतरही सरकारकडून आघाडीवर असलेल्या योद्ध्याची सुविधा नाही मिळाली.

विश्वास आरोटे यांनी बोलताना सांगितले की ग्रामीण व शहरी भागातील पत्रकारांना एकत्र आणण्याचे काम महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने केले आपल्या समाजाचं देणं लागतो ही उदांत भावना मनात धरून राज्य पत्रकार संघाने 365 दिवस विविध उपक्रम राबवत असताना कोकण विभागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली त्यावेळेस 6 ट्रक धान्य व इतर साहित्य वितरण केले त्याच बरोबर कोरोना काळात गोरगरीब नागरिकांना किराणा व तसेच इतर साहित्याची देखील संपूर्ण राज्यभरात वितरण करण्यात आले राज्य सरकारने पत्रकारांना 50 लक्ष रुपयांचा विमा कवच देऊ असे राज्याचे आरोग्य मंत्री नामदार राजेश टोपे यांनी पुणे येथे सांगितले मात्र कोरोना मध्ये 325 पत्रकारांचा बळी केला. मात्र सरकारने कोणत्याही पत्रकाराला व त्याच्या कुटुंबियांना मदत केली नाही मात्र राज्य पत्रकार संघाने मयत पत्रकार यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली. देशाचे अर्थमंत्री डॉ. भागवत कराड याचबरोबर विविध मंत्री महोदय यांची बैठक घेऊन पत्रकारांना पत्रकारितेबरोबर व्यवसाय कसा देता येईल यासाठी राज्य पत्रकार संघाच्या वतीने काम केले जाईल राज्य सरकारने कोरोना योध्दा म्हणून सर्वांना सन्मानित केले मात्र प्रकारांकडे दुर्लक्ष केले राज्य पत्रकार संघाने कोरोना काळातील योद्ध्यांचा विशेष सन्मान करून त्यांच्या कार्याची पावती त्यांना दिली दुर्लक्षित घटकाला त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य पत्रकार संघाच्या वतीने सन्मानित करण्यात येते असे यावेळी आरोटे यांनी बोलताना सांगितले.

दुसऱ्या सत्रात प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्रीपाद अपराजित, दैनिक लोकशाही वार्ताचे संपादक भास्कर लोंढे, दैनिकराष्ट्र प्रकाशचे संपादक डॉ. श्रीपाद अपराजित, दैनिक लोकशाही वार्ताचे संपादक भास्कर लोंढे, दैनिक राष्ट्र प्रकाशचे संपादक सुदर्शन चक्रधर, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय नेते शब्बीर अहमद विद्रोही यांनी पत्रकारांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी विदर्भ अध्यक्ष प्रा. महेश पानसे, सरचिटणीस शरद नागदेवे, विदर्भ संघटक आनंद शर्मा, नागपूर जिल्हाध्यक्ष प्रदीप शेंडे, विदर्भ उपाध्यक्ष अनुप कुमार भार्गव, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील बोकडे, याशिवाय विदर्भ अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, फरहीन शहा, रोहिल्ला बेग, सुरेंद्र कश्यप, मो.इ. डॉ सुधीर कमलाकर इतरांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या विविध भागातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मोहम्मद सलीम यांनी केले तर नीलेश सोमाणी यांनी पाहुण्यांचे आभार मानले.






**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अधिवेशन जळगाव येथे संपन्न झाले. या वेळी पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा सत्कार करताना प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे आदी.**

# वृत्तपत्रांच्या आर्थिक विषयांवर मंत्रिमंडळात चर्चा करु : ना.गुलाबराव पाटील

राजकारणी आणि पत्रकारांनी समन्वयाने काम केले तर राज्याच्या विकासाला गती मिळेल असे सांगुन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीनुसार पत्रकारांना स्थानिक पातळीवरील शासकीय-निमशासकीय समितीवर अशासकीय सदस्य म्हणुन नियुक्ती देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीतही हा विषय घेऊन राज्यभरातील पत्रकारांना विविध समित्यांवर घेण्यासाठी आपण प्रयत्न करू अशी ग्वाही पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. तर कोरोनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत वृत्तपत्रांनी विक्री किंमत वाढवून आर्थिक स्थिरता निर्माण करावी यासाठी वाचकानाही आपली मानसिकता तयार करावी लागेल असे मत पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई चे उत्तर महाराष्ट्र विभागीय अधिवेशन जळगाव येथे कामगार दिनी 1 मे रोजी पाणीपुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत व पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दोन सत्रात झाले. यावेळी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे, आ. सुरेश भोळे (राजुमामा), महापौर सौ. जयश्री महाजन, माजी मंत्री गुलाबराव देवकर, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलीस अधीक्षक डॉ. प्रविण मुंडे, मनोकल्पचे संचालक मनोज वाणी, मंगळग्रह संस्थानाचे अध्यक्ष डिगंबर महाले आदि उपस्थित होते. यावेळी बोलतांना मंत्री गुलाबराव पाटील यांनी पत्रकारांमुळेच राजकीय कार्यकर्त्यांची जडणघडण होत असते. राज्यकर्त्यांच्या चुका दाखवण्याचे आणि समाजाला दिशा देण्याचे काम स्थानिक पातळीपासून ते राज्य पातळीपर्यंत पत्रकारांच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे राजकारणी आणि पत्रकारांनी समन्वयाने काम केले तर राज्याच्या विकासाला गती मिळू शकते. माझ्या वैयक्तिक जडणघडणीत तर पत्रकारांचा खुप मोठा वाटा आहे. मराठी पत्रकार संघ पत्रकारांच्या अडीअडचणीत धावून जाणारा आणि अडचणीच्या काळात वेगवेगळ्या माध्यमातून मदतीसाठी तत्पर असतो. त्यामुळे संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीनुसार स्थानिक पातळीवर शासकीय, निमशासकीय समित्यांवर पत्रकारांना अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती देण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. त्याचबरोबर पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि राज्यभर विविध समित्यांवर संधी देण्यासाठी मंत्रीमंडळाच्या बैठकीतही याबाबत चर्चा करू अशी ग्वाही गुलाबराव पाटील यांनी दिली. तर पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी कोरोनाचा सर्वाधिक फटका हा वृत्तपत्र क्षेत्राला बसला असून जाहिरातींचा व्यवसाय कमी झाल्याने आणि वृत्तपत्र कागदाच्या किंमतीसह इतर वस्तुंचे भाव वाढल्यामुळे स्वस्तात वृत्तपत्र देणे आता अवघड झाले आहे. त्यामुळे वृत्तपत्रात काम करणाऱ्या पत्रकार आणि इतर कर्मचाऱ्यांच्या रोजगार अस्थिर झाला आहे.

देशभरातील चाळीस हजार कोटी रुपयांचा वृत्तपत्र व्यवसाय दहा हजार कोटींवर आला आहे. त्यामुळे वृत्तपत्रांनी इतर देशांप्रमाणे वृत्तपत्रांची विक्री किंमत उत्पादन खर्चाच्या तुलनेत वाढवून अस्थिरता थांबवावी. तरच वृत्तपत्र क्षेत्रात काम करणाऱ्या पत्रकार अणि कर्मचाऱ्यांना स्थिरता मिळेल. वृत्तपत्रात काम करणारा राज्यात आणि देशात मोठा घटक आहे. या घटकाचेही प्रश्न आणि अडचणी सरकारने स्वतंत्रपणे समजून घेऊन मार्ग काढावा असे आवाहन केले. कोरोना काळामध्ये महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने संपूर्ण राज्यभरातील गोरगरीब नागरिकांना सुमारे दीड कोटी रुपयांचे किराणा धान्य व इतर साहित्य वितरण करण्यात आले. तर अतिवृष्टीमुळे महाड, चिपळूण, रत्नागिरी, ठाणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात हाणी झाली, या ठिकाणी सहा ट्रक साहित्य राज्य पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आले. यावेळी पत्रकार संघांचे राज्य प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, मराठवाडा संपर्क प्रमुख कुंडलिक वाळेकर, संजय फुलसुंदर, उपमहापौर कुलभूषण पाटील, शालिग्राम गायकवाड, मुकुंद नन्नावरे, प्रविण सपकाळे, किशोर रायसाकडा, प्रमोद सोनवणे, मिलिंद लोखंडे, जिल्हाध्यक्ष जितेंद्रसिंग राजपूत, जगदीश सोनवणे, प्रदिप गायके, दीपक सपकाळे, शरद कुलकर्णी, भूषण महाजन, नजनीन शेख, भगवान मराठे, संजय चौधरी, कमलेश देवरे, विलास ताठे, भानुदास चव्हाण, विजय गाढे, महेंद्र सूर्यवंशी, गोपाल सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयाज मोहसीन यांनी केले.



# माध्यमांचे अर्थकारण नव्याने मांडणारे नेतृत्व

संतोष कानडे

बीड हा केवळ ऊसतोड कामगारांचा किंवा बेरोजगारांचा जिल्हा नाही; तर तो नेतृत्व करणाऱ्यांचा देखील जिल्हा आहे. इथल्या मातीत नेतृत्वाची बिजं जन्मजात असतात की काय असं वाटतं. 'अभ्यासोनि प्रकटावे' हा वसा घेऊन पुढे जाणाऱ्यांची संख्या कमी का असेना, पण ती निश्चित आहे. तसेच बीड पत्रकारांचादेखील जिल्हा आहे. इथे भरपूर पत्रकार आहेत – रोजगार शोधू पाहणारे, न्यायाची तडफ असलेले आणि नाव कमावू पाहणारे. या सगळ्यांची लढाई आधी स्वतःशी आणि नंतर व्यवस्थेशी आहे. हे लढे एकेकाळी कसे एकाकी बिनसूत्री होते. वसंत मुंडे यांनी या लढ्यांना एका सूत्रात बांधलं.
साधारण वीस वर्षांपूर्वी पत्रकारितेत आलेले वसंत मुंडे यांचं नाव आज राज्यभर पोहोचलं आहे. त्याला कारण पत्रकारांचे प्रश्न आणि ते सोडवण्याची कला! 'कला' हा शब्द यासाठी की, नुसती तडफ असून चालत नाही वा नुसता वेळ देऊनदेखील भागत नाही. प्रश्नांची जाण निर्माण करुन ते सोडवून घेण्यासाठी एक हातोटी माणसाच्या अंगी असावी लागते. ती मुंडेंमध्ये आहे. तुमचं 'बेसिक' पक्कं असेल तर छोटछोटे उपायदेखील मोठे परिमाणकारक ठरू शकतात, हे आता त्यांनी सिद्ध केलंय. एक वेळ राजकीय संघटन तितकंसं त्रासदायक नसेल इतकं पत्रकारांचं असतं. कारण पत्रकार नेहमी प्रश्न उपस्थित करण्याच्या आणि बोट दाखवण्याच्या भूमिकेत असतात.



**प्रश्न जाणून लढ्याची आखणी**

वसंत मुंडे यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून जिल्हाध्यक्षपदापासून काम केलं. पुढे मराठवाडा अध्यक्ष, राज्य कार्याध्यक्ष; आणि आता प्रदेशाध्यक्ष. शिवाय राज्य शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे ते विभागीय अध्यक्ष आहेत. या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न त्यांना उमजले आणि लढा सुरू झाला. पत्रकारांचं मानसिक स्थैर्य ते आर्थिक सुबकता यासाठीचा त्यांचा लढा यशाच्या वाटेवर आहे. तेही राज्यातील अग्रगण्य दैनिक लोकसत्तामध्ये काम करत असताना.
पत्रकारांना प्रश्न असतात, दैनिकांच्याही समस्या असू शकतात किंवा एकूणच पत्रकारितेमध्ये अस्थैर्य वगैरे असू शकते; यावर विश्वास न बसणारा अलीकडचा काळ. त्यामुळे लढा, न्याय, अन्याय, प्रश्न, मागणी... हे फक्त बातमीतच वापरायचे शब्द, असा समज झालेला. इतरांचं सोडा पण पत्रकारांचंही तसंच! दिव्याखाली अंधार असावा अगदी तसं. परंतु 'पत्रकारांचेही प्रश्न आहेत आणि ते सोडवले पाहिजेत' हे ठणकावून जर कुणी सांगितलं असेल, तर ते वसंत मुंडेंनी! स्वतः उपाशी असणारा दुसऱ्याचं काय भलं करेल? हे साधं-सोपं गणित! पण ते कुणाला वळत नव्हतं. अन्यायाच्या छायेत जगणारा दुसऱ्याला न्याय देऊ शकेल काय? त्याचे प्रयत्न खरंच प्रामाणिक असतील काय? हा खरा प्रश्न विचारण्याची धमक मुंडेंमध्ये आहे. आज परिस्थिती बदलत आहे. पत्रकार, छोटी दैनिकं, मीडिया हाऊसेस जागरुक होत आहेत. पत्रकारितेच्या अर्थकारणाचं रुतलेलं चाक गती घेण्याच्या बेतात आहे. वसंत मुंडेंचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत ते नक्की फळाला येतील.

**सोबतीला घेऊन चालणारे सक्षम नेतृत्व**

प्रत्येक क्षेत्रात संघटना असतात. पुढारपण करणारे असतात. राज्यशास्त्राच्या निकषानुसार नेतृत्वाचा एक पाय संघटनेत आणि दुसरा प्रगतीच्या दिशेने उंचावलेला पाहिजे. तरच ती संघटना, तो समाज प्रगती साधू शकतो. दोन्ही पाय समाजात वा संघटनेत असून चालत नाही. किंवा दोन्ही पाय विकासाच्या दिशेने जाणारेही चालत नाहीत. सोबत घेऊन चालणं, ही संकल्पना सक्षम नेतृत्वाचं दायित्व सांगणारी आहे. वसंत मुंडे यांचं नेतृत्व हे असंच निपुण आहे. त्यामुळेच ते छोट्या दैनिकातल्या पत्रकारांचे प्रश्न घेऊन मुंबई-दिल्लीच्या वाऱ्या करीत असतात. पत्रकारांचे प्रश्न असतात तरी काय? अपुरं मानधन, कामाच्या वेळा निश्चित नसणं, जेवणाच्या वेळा निश्चित नसणं, आरोग्याच्या सुरक्षेची कसलीच हमी नाही आणि पुरेशी सुटीही नाही, कुटुंबासाठी पैसेही नाही आणि वेळही नाही. अशी ही वेठबिगारी! अशा कात्रीत सापडलेल्या पत्रकारांसाठी काय करता येईल; यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न बघून त्यांच्यातलं प्रयोगशील नेतृत्व अधोरेखित होतं.
अधिस्वीकृती समितीचं विभागीय अध्यक्षपद आल्यानंतर मुंडे यांनी एक प्रयोग केला, खुल्या चर्चेचा. पत्रकारितेच्या इतिहासात असा प्रयोग यापूर्वी कुणीही केलेला नव्हता. राज्यात अनेक शहरात जाऊन त्यांनी तिथल्या पत्रकारांशी थेट संवाद साधला. तुमचे प्रश्न काय आहेत? अधिस्वीकृती पत्रिका मिळवण्यासाठी कुठल्या अडचणी आहेत वा कुठले जाचक नियम आहेत? पत्रकारांना अधिस्वीकृती सहजपणे कशी मिळेल आणि त्यातून जास्तीत जास्त फायदे कसे मिळवून देता येतील, यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यात त्यांना यशही आले. त्यांच्या कार्यकाळात ज्येष्ठ पत्रकारांना अधिकाधिक अधिस्वीकृती पत्रिका मिळाल्या. महत्वाचं म्हणजे अधिस्वीकृती पत्रिकेसाठी दैनिकांचा कोटा वाढवून घेण्यात मुंडेंनी मोलाचं योगदान दिलं. त्यामुळे तालुकास्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आणि मुख्यालयात काम करणाऱ्या पत्रकारांचा अतिरिक्त 'अधिस्वीकृती' मिळाल्या. अर्थात हे सगळं साध्य झालं ते प्रश्न समजून घेतल्याने. त्यामुळे मराठवाड्यातील आणि राज्यातील पत्रकार मुंडेंच्या नेतृत्वावर अढळ आहेत.

**अर्थकारण सावरणारी ब्लू-प्रिंट**

मुंडेंनी पत्रकारांसाठी काम केलं म्हणजे नेमकं काय केलं, हे खऱ्या अर्थाने समजून घ्यायचं असेल तर त्यांनी मांडलेलं 'अर्थकारण' किंवा 'अर्थधोरण' समजून घ्यावं लागेल. तेव्हा खऱ्या अर्थाने मुंडेंची ब्लू-प्रिंट समजून घ्यायला मदत होईल. सोशल मीडिया आणि डिजिटल पत्रकारिता यामुळे छोटी दैनिकं डबघाईला आलेली. त्यात दोन वर्षं पडलेलं कोरोना सावट. त्यामुळे संपूर्ण माध्यमविश्वावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. मीडिया हाऊसेसनी जराही विधिनिषेध न बाळगता कर्मचारी कपात केली. छोटी दैनिकं तर पुरती कोलमडली. मानधनावर काम करणारा जिल्हा आणि तालुका पत्रकार कमालीचा बेचैन झाला. अशा परिस्थितीत वसंत मुंडे गप्प कसे राहतील? लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून विविध पत्रकारोपयोगी उपक्रम राबविणं सुरू झालं. पत्रकारांना धीर मिळाला. पण माध्यमविश्वाला उभं करण्यासाठी कायमचा उपाय आवश्यक होता. मुंडेंनी साधारण २०२०-२१मध्ये दैनिकांच्या किंमती वाढवण्यासंबंधी नवा विचार मांडला. धक्कादायक होतं हे. सगळ्यांनी नजरा टवकारल्या, भिवया उंचावल्या. किंमती वाढवणं कसं शक्य होईल?, लोक पेपर विकत घेतील काय? त्यातून असं काय साध्य होईल? असे प्रश्न समोर येऊ लागले. या काळात त्यांनी भेटीगाठी आणि संवादावर भर दिला. आपलं म्हणणं सोपं करुन सांगितलं. ते पटवून देण्यासाठी तासनतास बोलत राहिले. बाजारपेठेत प्रत्येक उत्पादनाचं स्वतःचं एक मूल्य असतं. ते ठरवण्याचे अधिकार त्या उत्पादकाला असतात. त्यासाठीचा कच्चा माल, मनुष्यबळ, वीज, वाहतूक, वितरण, हा सगळा खर्च गृहीत धरून मग उत्पादनाचं मूल्य ठरवावं लागतं. हेच बाजाराचं गणित असतं. पण वृत्तपत्रक्षेत्र याबाबतीत गाफील होतं. स्वमूल्याची जाणीव माध्यमांना नव्हती खरी. चार पानी दैनिकाच्या एका अंकाचा खर्च वीस ते तीस रुपये आहे, आठ पानी दैनिकाचा खर्च पन्नास-साठ रुपयांच्या घरात आहे. मग दैनिकाचं मूल्य दोन-पाच रुपयेच का, हा तो बिनीचा प्रश्न. वसंत मुंडेंनी तो ठासून बिंबवला! 'हळू हळू किंमती वाढवा, दैनिकाचा खर्च भागला तर आर्थिक साक्षरता येईल' असं बेरजेचं गणित मांडायला सुरुवात केली. त्यात ते यशस्वीदेखील झाले. राज्यात जवळपास दीडशे ते दोनशे दैनिकांनी किंमती वाढवण्याचा निर्णय घेतला आणि वाढवल्यादेखील. विशेष म्हणजे कुठल्याच दैनिकाच्या खपावर विपरित परिणाम झालेला नाही. कुणाचा अंक कमी झाला नाही की कुण्या वाचकाने साधी तक्रारही केली नाही. अगदी बिनबोभाटपणे दैनिकं सक्षम होऊ लागली.

मोहीमच सुरू झाली. हे लोण आता राज्यभर पसरू पाहात आहे. छोटाच उपाय पण मोठा परिणामकारक ठरला.

दैनिकं खंबीरपणे उभी राहिली तर पत्रकारिता टिकेल, हेच तर मूळ सूत्र आहे. शिवाय याबाबत त्यांनी दिल्लीपर्यंत आवाज उठवला. दैनिकांची नोंदणी ज्या कार्यालयात होते, त्या 'आरएनआय' मधील अधिकाऱ्यांनादेखील त्यांनी दैनिकांच्या किंमतीबाबत पटवून दिलं. तेव्हा अधिकारीही आवाक झाले. आता याबाबतचा स्वतंत्र प्रशासकीय वा न्यायालयीन लढा मुंडेंनी सुरू केला आहे. एकदा का या 'पंजीयक' कार्यालयाने दैनिकांच्या मूल्यावर अधिकृत निर्णय घेतला, मग माध्यमविश्वाला राखेतून वर यायला वेळ लागणार नाही.

**साप्ताहिक सुट्टी घ्या**

वसंत मुंडेंचा पुढचा मुद्दा तर आश्चर्यकारक आहे. साप्ताहिक सुटीचा. 'छे पेपरला कुठं सुटी असते का? सुट्टी सोडून बोला हो,' अशा प्रतिक्रिया आल्या. इथंही मुंडेंनी त्याचं अर्थकारण आणि आरोग्यकारण पटवून दिलं. 'एखादं दैनिक छापून वाचकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी किती खर्च येतो? त्यातून एका दिवसाचा किती खर्च? महिन्यातल्या चार दिवसांचा आणि वर्षातल्या ४८ दिवसांचा किती खर्च वाचला? दैनिकांना साप्ताहिक सुट्टी नसावी, असा काही नियम नाही. एक तर खर्च वाचतो आणि दुसरं कर्मचारी खूश राहतात. आज शासनाने पाच दिवसाचा आठवडा केलाय. अनेक खासगी कंपन्या आणि कॉर्पोरेट न्यूज सेक्टरमध्येसुद्धा पाच दिवसाचा आठवडा आहे. मग छोट्या दैनिकांनी आणि पत्रकारांनी काय घोडं मारलं? उलट सुट्टीमुळे अधिकच्या उर्जेने पत्रकार काम करू शकेल!' हाही मुद्दा राज्यातल्या अनेक दैनिकांनी मनावर घेतलाय. काहींनी यावर विचार करुन सुट्ट्यादेखील सुरु केल्यात. या निर्णयांमुळे पत्रकारितेविषयी आपलेपणा, आकर्षण निर्माण होण्यास मदतच होणार आहे. यासोबतच पत्रकार पेन्शन आणि पत्रकार संरक्षण कायदा होण्यास मुंडेंचं मोलाचं योगदान आहे.

जिल्हा दैनिकं, छोटी विभागीय दैनिकं यांचा केंद्र सरकारने लघुउद्योगामध्ये समावेश करण्याची मागणी वसंत मुंडे करत आहेत. यासाठी त्यांनी केंद्रीय लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्याशी बोलणी सुरू आहे. दैनिकांना लघुउद्योगाचा दर्जा मिळाला तर ते त्या उद्योग विभागाच्या कक्षेत येतील. छपाई मशिनसाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल, कर सवलत आणि एमआयडीसी भागात छापखान्यासाठी जागाही मिळेल. शिवाय अर्थसंकल्पातून या व्यवसायाला तरतूद होण्याची आशा आहे. अर्थात दैनिकं सक्षमपणे उभं राहतील. जनसामान्यांचा आवाज आणखी बुलंद होईल. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. मुंडेंचे प्रामाणिक प्रयत्न मात्र सुरू आहेत.

**वृत्तपत्र ग्राहकाला कर-सवलत**

आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे दैनिकाचा खप वाढू शकेल. शिवाय सकस लेखनाला अर्थाश्रय मिळेल. तो म्हणजे वृत्तपत्र खरेदीवर कर सवलत. वाचकाने वर्षभर वृत्तपत्र खरेदी केले, तर त्याला त्याच्या उत्पन्न कर परताव्यामध्ये पाच हजार रुपयांची सवलत मिळावी, या मागणीसाठी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची वसंत मुंडेंनी अनेकदा भेट घेतली. त्यावर चर्चा सुरू आहेत. या निर्णयावर सरकारने गांभीर्याने विचार केला तर दैनिकं पाय रोवून खंबीरपणे उभा राहतील. निदान कर सवलतीच्या निमित्ताने घरोघरी वाचन परंपरा रुजण्यात मदत होईल. चांगलं लिहिणारे पुढे येतील. पत्रकार अभ्यासपूर्ण मांडणी करण्यासाठी बांधिल राहतील. एवढे सगळे साध्य सिद्ध होऊ शकतात. केंद्र सरकारने ठरवलं, चांगले निर्णय घेतले तर दैनिकांच्या पडक्या वाड्यांना मजबूत भिंती आणि कौलं लागू शकतील. वसंत मुंडे हे त्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**लढवय्याचं नेतृत्व**

वसंत मुंडे म्हणजे पत्रकारांसाठी लढणारा लढवय्या आहे. पत्रकारांचं नेतृत्व काय करु शकतं, याचं हे उदाहरण आहे. सर्व पत्रकारांनी प्रामाणिक साथ देऊन वसंत मुंडे यांचा हात बळकट करण्याची गरज आहे. पत्रकारितेचा चेहरा-मोहरा बदलल्याशिवाय व्यवस्थेचा चेहरा बदलणार नाही. त्यासाठी पत्रकार; ज्याला चौथा स्तंभ म्हणतात, तो खंबीर होणं गरजेचं आहे. अधिस्वीकृतीतील सुलभता, दैनिकांची मूल्यवाढ, साप्ताहिक सुटी, वाचकांना करसवलत, दैनिकांना लघू उद्योगाचा दर्जा, पत्रकारांना सन्मानजनक मानधन; या सगळ्या आघाड्यांवर वसंत मुंडेंचं काम सुरू आहे, त्यांचं काम एक दिवस नवा इतिहास रचेल यात तिळमात्र शंका नाही.






# वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या करदात्यांना सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवू

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना ग्वाही

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या मागणीवरुन वृत्तपत्र व्यवसायाला आर्थिक दृष्ट्या बळ देण्यासाठी वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या करदात्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपयांची सुट देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकार केंद्रीय अर्थ मंत्र्यांकडे पाठवेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना दिली.

अंबाजोगाई येथे नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी शुक्रवार दि. ८ एप्रिल रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री धनंजय मुंडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, संतोष मानूरकर, वैभव स्वामी यांनी भेट घेऊन कोरोनामुळे अडचणीत आलेल्या वृत्तपत्र व्यवसायाला आर्थिक पाठबळ देण्यासाठीची मागणी केली. वर्षभरापासून पत्रकार संघाच्या माध्यमातून वृत्तपत्र व्यवसायाला आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या करदात्यांना वार्षिक पाच हजार रुपयांची सुट द्यावी अशी मागणी लावून धरली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या मागणीबाबत वसंत मुंडे यांनी सविस्तर माहिती दिली. मागणीबाबतची वस्तुस्थिती जाणुन घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी मागणीचे स्वागत करुन तात्काळ राज्य सरकारच्या वतीने केंद्र सरकारकडे प्रस्ताव दिला जाईल. पत्रकार संघाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा. राज्य सरकारचे पूर्ण समर्थन राहील अशी ग्वाही दिली. तर पत्रकारांच्या इतरही मागण्यांबाबत लवकरच याबाबत मुख्यमंत्र्यांशी बोलून निर्णय घेतला जाईल अशी ग्वाहीही त्यांनी दिली. वृत्तपत्र व्यवसाय जाहिराती कमी झाल्यामुळे आणि विक्री किंमत उत्पादन खर्चापेक्षा केवळ तीस टक्के असल्याने अडचणीत आला आहे. कागदाचे भाव वाढल्यामुळे तर अडचणीत अधिकच भर पडली आहे. त्यामुळे राज्यभरातील वृत्तपत्रात काम करणाऱ्या पाच लाख लोकांचा रोजगार अस्थिर झाला असल्याची वस्तुस्थिती अजित पवार यांना सांगितल्यानंतर त्यांनी या व्यवसायाला मदत करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. राज्य सरकार प्रस्ताव देणार असल्याने पत्रकार संघाच्या मागणीला अधिक बळ मिळणार आहे.



# वृत्तपत्रांना लघुउद्योगाचा दर्जा देण्याचा विचार करु : केंद्रीय मंत्री नारायण राणे



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिल्ली दौऱ्यात नव्याने केंद्रात गेलेल्या महाराष्ट्रातील मंत्र्यांच्या भेटी घेऊन त्यांना पत्रकारांच्या विकासाचे साकडे घातले. केंद्रीय उघु उद्योगमंत्री नारायण राणे यांच्यासोबत वसंत मुंडे यांनी नवी दिल्लीतील निवासस्थानी पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. औरंगाबादेत सप्टेंबर 2020 मध्ये राज्यातील संपादकांची पहिली गोलमेज परिषद घेण्यात आली होती. या ऐतिहासिक गोलमेज परिषदेत राज्यातील संपादकांनी सर्वानुमते मराठी वृत्तपत्रसृष्टीला लघुउद्योजकाचा दर्जा देण्याचा ठराव मांडला होता. या ठरावानुसार महाराष्ट्रातील प्रादेशिक व जिल्हास्तरावरील वृत्तपत्रांना लघुउद्योजकांचा दर्जा द्यावा, अशी मागणी वसंत मुंडे यांनी ना. नारायण राणे यांच्याकडे केली.

यावेळी नारायण राणे यांनी पत्रकारांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन देऊन वृत्तपत्र सृष्टीला लघुउद्योगाचा दर्जा देण्यासंदर्भात आपण सविस्तर प्रस्ताव द्या, तो मी मंत्रिमंडळ बैठकीत नक्कीच ठेवेल व तो मंजूरही करून घेईल, असे आश्वासन दिले.








सरचिटणीस









दैनिक लोकाशा महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
Good Morning! बीड
रविवार दि.६ सप्टेंबर २०२० पान ८

# चौथ्या स्तंभाला लोकांचा अर्थाश्रय खेचून आणू

## वसंत मुंडेंच्या भूमिकेने वृत्तपत्र क्षेत्राचे अर्थगणित बदलणार आणि सुधारणार

**मुलाखत निर्वाणीची**




बनते त्या पेक्षा स्वस्तात विकले जाणारे जगातले एकमेव उत्पादन म्हणजे वर्तमानपत्र, बनते १० रुपयात अन विकते ३ रुपयात, १ रुपयाचा चहा १० ला झाला, चार आण्याच्या दोन कोंबडा बिड्या ओढणारा समाज आता १५ रुपयाची लाईट सहज घेऊ शकतो. बिस्किटाच्या पुड्यावर देखील सर्विस टक्स लावला जातो मात्र भल्या पहाटे दारात येणारा पेपर फुकट मिळतो. या क्षेत्राने वसा या नावाखाली आपली प्रगतीच नाकारली आणि दुर्दैवाने हे क्षेत्र केवळ मेटाकुटीला नाही तर पुढची पिढी देईल का नाही या शासंक वळणावर येऊन ठेपले आहे. जगाला आणि जगण्याला समृद्ध करणाऱ्या या क्षेत्राला लोकाश्रय असेल नसेल मात्र अर्थाश्रय मिळवून देण्यासाठी बीडच्या भूमीपुत्राने निर्णायक आणि ऐतिहासिक भूमिका घेतली आहे. वसंत मुंडे यांच्या ओळखीची गरज नाही, पेपर टाकणारा युवक ते राज्याच्या पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष असलेले वसंत मुंडे यांनी मोठी अभ्यासपूर्ण भूमिका घेतली आहे. चला समजून घेऊयात...

**प्रश्न: नमस्कार, नक्कीच ओळख देण्याची गरज नसल्याने वसंत मुंडे यांच्या सोबत आज तुमची भूमिका जाणून घेणार आहोत. काय सांगाल?**

**उत्तर** : सरकारचे धोरण, कोरोनाचे संकट, समाज माध्यमांचा वाढता प्रभाव यामुळे वृत्तपत्र माध्यम अडचणीत सापडले आहे. विभाग, जिल्हा स्तरावरुन प्रकाशित होणारे शेकड्याने वृत्तपत्र बंद असुन पुन्हा सुरु होतील का? याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. कोरोनाच्या काळात अवघ्या चार महिन्यात जाहिराती कमी झाल्याने पन्नास, पंचवीस वर्षाची परंपरा असलेल्या दैनिकांनाही खर्च परवडत नसल्याने संपादकासह पत्रकार आणि इतर विभागातील कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी केले जात आहे. तर काही वृत्तपत्रांनी कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी कपात केल्याने या क्षेत्रातील जवळपास तीस हजार पेक्षा जास्त लोकांच्या हातचे काम गेले असुन अनेकांवर बेरोजगार होण्याची वेळ ओढावली आहे.

**प्रश्न–तुमची भूमिका भूमिका या क्षेत्राला नवी दिशा देणारी आणि समाजाला अंतर्मुख करणारी आहे?**

**उत्तर**: होय भागवत आता तू समजून घे, वयाची चाळीशी ओलांडलेल्या आणि करीअर म्हणुन या क्षेत्रात आलेल्या लोकांनी आता करायचे काय? असा प्रश्न उभा आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या वृत्तपत्र माध्यमे इतकी मेटाकुटीला का आली? याबाबत मात्र कोणी चर्चा करायला तयार नाही. जगाच्या पाठीवर एकमेव याच व्यवसायात उत्पादन खर्चाच्या केवळ तीस टक्के किंमतीत वृत्तपत्राचा अंक घरपोहच दिला जातो. उत्पादन आणि विक्री किंमतीतील तुट जाहिरातीच्या अतिरिक्त उत्पन्नातून भागवण्याचे अर्थगणित या व्यवसायाने स्वीकारले असल्याने वर्षानुवर्ष तुट भरुन काढण्यासाठी तारेवरची कसरत सुरु आहे. परिणामी काही मोजकी वृत्तपत्र सोडली तर विभागीय आणि जिल्हा स्तरावरील वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती दर महिन्याला कर्मचाऱ्यांचा वेळेवर पगार करण्या इतकीही सक्षम होऊ शकली नाही.

**प्रश्न : वृत्तमान पत्राची किंमत समाज मान्य करेल का?**

उत्तर : भागवत महत्वाचा प्रश्न विचारलास... हा न्युनगंड जोपर्यंत आम्ही काढणार नाहीत, तोपर्यंत आम्ही समाजासमोर हा प्रश्न घेवून जाऊ शकत नाही. गेल्या दहा वर्षांचा अभ्यास केला. तर सहज लक्षात येईल, आमच्या दैनंदिन गरजेतील, चवीतील, व्यसनेतील वस्तूंचे भाव आठ ते दहा पट वाढले आहेत. यापेक्षा महत्वाचे समाजाने ते स्विकारलेले आहेत. वृत्तमानपत्र देखील समाजाच्या गरजेचं उत्पादन आहे. नक्कीच एका कटींगसाठी व्यक्ती दहा रुपये खर्च करत असेल तर आमच्या ज्ञानाच्या कक्षा, माहितीचा परिघ रुंदावणाऱ्या पेपरसाठी दहा रुपये त्याला जड जाणार नाहीत. आम्ही फक्त समोर आलो पाहिजे.

**प्रश्न: बदलत्या जगात आणि धोरणात याच क्षेत्राचे अर्थशास्त्र का बदलले नाही?**

उत्तर: जागतिकीकरणामध्ये इतर क्षेत्राप्रमाणेच वृत्तपत्र व्यवसायातही नवे तंत्रज्ञान आल्याने झपाट्याने बदल झाला. प्रसारमाध्यमांचे स्वरुपही बदलत जाऊन नवीन माध्यमे विकसित झाली. मात्र जागतिकीकरणातील बदलाच्या तुलनेत वृत्तपत्र व्यवसायाच्या अर्थकारणात मात्र फारसा बदल झाला नाही. या क्षेत्रातील दिग्गज बुध्दीवाद्यांनी, काम करणाऱ्या पत्रकारांनी सामान्य गरीब राहुनच समाजाचे प्रश्न मांडावेत ही अपेक्षा तत्वाच्या नावाखाली माथी मारली. प्रत्यक्षात वृत्तपत्र व्यवसायात भांडवलदार, राजकारण्यांनी शिरकाव करुन फायदा करुन घेतला. मात्र वृत्तपत्र व्यवसाय जाहिरातदारांच्या मदतीवरच अवलंबून राहील अशीच व्यवस्था राबवली. त्यामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या संपादक, पत्रकार, वार्ताहरांना कायम जाहिरातदार राजकीय पुढारी आणि उद्योजकांच्या दारात उभे केले. जाहिरातीचे टारगेट पूर्ण करण्याचा दबाव आणि वसुलीवर महिन्याचा पगार ही परिस्थिती समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या संपादक, पत्रकारांची असल्याने अप्रत्यक्षपणे जाहिरातदारांचे गुलामच केले. कोरोना संकटाने व्यवसाय बंद झाल्याने आणि समाज माध्यमाचे प्रभावी अस्त्र आल्यामुळे जाहिरात आता जवळपास बंद झाल्याने वृत्तपत्रांसमोर अंक प्रकाशित कसा करायचा? असा प्रश्न आहे. वृत्तपत्राचा आठ पानाचा एक अंक तयार करण्यासाठी जवळपास एकूण दहा रुपये खर्च येत असताना एकही रुपयाची जाहिरात नसल्यामुळे तीन रुपयात विकून सात रुपयांचा तोटा भरायचा कोठून? यामुळे बहुतांशी दैनिकांनी प्रकाशन बंद ठेवून ऑनलाईन वर भर दिला आहे.

**प्रश्न: वर्तमान पत्र क्षेत्र टिकून राहिले याचे कारण काय?**

उत्तर : तर, व्यवसायातील लोकांचा प्रामाणिकपणा, वाचकांचा विश्वास यावर वृत्तपत्र टिकून राहिली. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य मिळवण्याच्या उद्देशाने वृत्तपत्रे मिशन म्हणुन निघाली. स्वातंत्र्योत्तर काळात अडाणी समाजाला जागृत करुन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि राजसत्तेवर अंकुश म्हणुन वृत्तपत्रांनी भूमिका बजावली. समाजाचा, राजकीय नेतृत्वाचाही वृत्तपत्र माध्यमांकडे बघण्याचा दृष्टीकोण सकारात्मक होता. त्यामुळे या क्षेत्राला सामाजिक प्रतिष्ठा मिळाली.

**प्रश्न : दैनिकांच्या अर्थशास्त्र वर केवळ भूमिका नाही तर कृती कार्यक्रम घेऊन येणारे आपण पहिले आहेत. नक्कीच आपण तो काय कार्यक्रम आहे हे सांगाल?**

उत्तर: होय, वृत्तपत्र चालकांना आणि पत्रकारांना भविष्यात जाहिरातदारांच्या भीकेवर हा व्यवसाय चालवण्याची मानसिकता बदलून इतर व्यवसायाप्रमाणे विक्री किमत वाढवुनच हा व्यवसाय टिकवण्याचे आव्हान पेलावे लागले. वृत्तपत्राच्या विक्री किंमतीतुनच चांगले उत्पन्न उभे राहिले तर वितरकांना कमिशनच्या माध्यमातून चांगला पैसा मिळेल, तर पत्रकार आणि कर्मचाऱ्यांनाही पुरेसा मागण्याचा अधिकार आणि निर्भिडपणे काम करण्याचे स्वातंत्र्य राहील. जाहिरात हा अतिरिक्त उत्पन्न मानले तरच जाहिरात दाराचीही मुजोरी कमी होईल. अलीकडे वृत्तपत्राला जाहिरात देणे म्हणजे उपकार केल्याची भावना निर्माण झाली असुन जाहिरातीचे पैसे तर देण्याची मानसिकताच राहिली नाही. त्यामुळे जाहिरातीच्या उत्पन्नावर तोटा भरुन काढण्याचा अर्थकारण आता बदलण्याची वेळ आली आहे. सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय लोकही मागच्या पाच वर्षात एक रुपयाचा चहा थेट दहा रुपये किंमतीमध्ये उभे राहून घेतात. तर एक लिटर पाण्याची बाटली तब्बल वीस रुपयांना कोणतीही कुरकुर न करता खरेदी करतात. एका ए४ आकाराच्या झेरॉक्स काढण्यासाठी दोन रुपये द्यावे लागतात. ए४ साईजचे चार पेज एकत्र केल्यानंतर वर्तमानपत्राचे एक पेज होते. केवळ झेरॉक्सचा हिशोब केला तरी वृत्तपत्राच्या एका पानासाठी आठ रुपये लागतील. बाजारात अशा पध्दतीचा दर असताना आठ पानाचे वृत्तपत्र केवळ दोन रुपये किंमतीमध्ये घरपोहच दिले जाते. दोन रुपये किमतीत वितरकांना पन्नास टक्के कमिशन दिले जात असल्याने वृत्तपत्र व्यवस्थापकाच्या हातात केवळ एक रुपया पडतो. कोणत्याही वस्तुची घरपोहच सेवा ही अतिरिक्त करासहित दिली जाते. उत्पादित प्रत्येक वस्तुची किमत ठरवण्याचा अधिकार उत्पादक कंपनीला असतो. आणि ठरवलेल्या किमतीत ग्राहकही घेतात. केवळ वृत्तपत्रच हे एकच उत्पादन कमी किंमतीमध्ये घरपोहच मिळते ही सवय बदलावी लागेल. वृत्तपत्रांची किंमत ठरवण्याचा अधिकारही आता वृत्तपत्र व्यवस्थापकांनी वापरला पाहिजे. कोणतीही बँक उत्पादन खर्च आणि विक्री किमतीत किमान वीस टक्क्यांचा नफा असेल तरच सदरील व्यवसायाला कर्ज देण्याचा विचार करते. त्यामुळे वृत्तपत्र व्यवसायातील उत्पादन खर्चाच्या तब्बल तीस टक्क्यांपेक्षाही कमी किमतीत विकण्याचा व्यवसाय बँकेच्याही कुठल्याच अर्थगणितात बसत नसल्याने कोणतीही बँक या व्यवसायाला कर्ज देण्यासाठी दारातही उभी करत नाही.



**प्रश्न: स्थानिक दैनिकांना लोकांचा आवाज म्हणून पाहितले जाते मात्र अलीकडच्या काळात अडचणी वाढल्या आहेत.**

उत्तर: स्थानिक पातळीवरीलही वृत्तपत्र बंद पडली तर अनेकांचा रोजगार जाणार आहे. पत्रकारापासून वेगवेगळ्या विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह वृत्तपत्र वितरक आणि घरोघरी अंक वाटप करणारी मुलेही बेरोजगार झाली आहेत. तर दुसऱ्या बाजुला लोकशाही व्यवस्थेत स्थानिक पातळीवर वृत्तपत्र बंद पडल्याने सामान्य माणसाचा आवाजच मुका होण्याचा धोका वाढणार आहे. स्थानिक माध्यमांचा प्रभावच संपला तर ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा प्रशासनासह राजसत्तेवरील अंकुश जाऊन सत्ताधारी व्यवस्था पूर्णपणे निरंकुश होईल.

**प्रश्न: आपण व्यक्त केलेली चिंता आणि त्यावर केलेले चिंतन अंतर्मुख करणारे आहे, आपण काय अपेक्षा कराल समाज आणि व्यवस्थेकडून?**

उत्तर : त्यामुळे वाचकांनीही एकूण वृत्तपत्र व्यवसायांची निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता वृत्तपत्र टिकली पाहिजेत यासाठी मदत करणं आवश्यक आहे. लोकशाहीत सामान्य माणसाचा आवाज व्यवस्थेपर्यंत पोहचवणारी स्थानिक वृत्तपत्र टिकवणे हो वाचक आणि समाजाची जबाबदारी आहे. अन्यथा स्थानिक वृत्तपत्र ही व्यवस्था बंद झाली तर सामान्य माणसाचा आवाजच बंद होईल. वृत्तपत्र चालकांनीही पारंपारीक व्यावसायीक रुढी थोड्या सैल करुन ही व्यवस्था टिकवण्यासाठी निर्णय घेण्याची मानसिकता करावी लागेल. वृत्तपत्र राहिली तरच या क्षेत्रातील पारंपारीक तत्व, प्रामाणिकपणा, रुढी सांभाळल्या जातील. त्यासाठी समाजाला जागृत करुन वाचकांची मानसिकता बदलण्याचेही आव्हान पेलावे लागेल. वृत्तपत्र हे जगाकडे पाहण्याची एक खिडकी आहे. भल्या सकाळी आपल्या घरात वृत्तपत्रांच्या माध्यमातून ज्ञान येते. ज्ञानाची किंमत होऊ शकत नाही. याचा विचार करुन आता लोकांनीही स्थानिक वृत्तपत्र व्यवसाय टिकवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. वृत्तपत्र व्यवसायाच्या आतबट्ट्याच्या आर्थिक गणितामुळे या क्षेत्रात अर्धे आयुष्य घालवलेल्या हजारो लोकांसमोर बेकारीचे संकट ओढावले असल्याने या क्षेत्रातील करीअरच संपत चालले आहे. त्यामुळे आता नवी पिढी कशी येणार? त्यामुळे या क्षेत्राला टिकवण्यासाठी या क्षेत्रातील धुरीणांनी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे.

उर्वरित प्रश्न पान ५ वर